**मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई सर्वांकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) ॲक्शन प्लान बाबतची दि.०९/०२/२०१६ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा ४ थ्या आढावा बैठकीचे इतिवृत.**

------------------------------

मा.सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०९/२०१५ रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन, मुंबई येथे टीटीसी इंडस्ट्रिअल, क्लस्टर नवी मुंबई येथील पर्यावरण कृती आराखडा अंमलबजावणीसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने, मा.सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. **०९/०२/२०१६** रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन, मुंबई येथे टीटीसी इंडस्ट्रिअल, क्लस्टर नवी मुंबई पर्यावरण कृती आराखडा अंमलबजावणीसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली. उपस्थित असलेले अधिकारी व उद्योगाचे प्रतिनिधी, तसेच संबंधित शासकीय प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम सह संचालक (हप्रनि), म.प्र.न.मंडळ यांनी उपस्थित सर्व प्रतिनिधी यांचे स्वागत करुन प्रस्ताविक केले. त्यानंतर सदस्य सचिव यांनी नवी मुंबई शहर व त्या लगतची टीटीसी औद्योगिक वसाहत याचा एकंदरीत विचार करता, सद्य:स्थितीत सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, सामायिक घातक कचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र, महानगरपालिकेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र ही कार्यरत आहेत असे नमूद केले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रसिध्द केलेले गुणांकन कमी करण्याकरीता सर्व सहभागीदार यांनी नियोजित व कालबध्द कार्यक्रम राबविणे आवश्यक झालेले आहे. त्या अनुषंगाने, विभागनिहाय जबाबदारी निश्चित करण्यात आलेली असून केलेल्या कामाचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर सह संचालक (हप्रनि), म.प्र.न.मंडळ यांनी नवी मुंबई क्लस्टरच्या पर्यावरण विषयक कृती आराखडयासंदर्भात सादरीकरण केले.

**सादरीकरणा दरम्यान झालेली मुद्देनिहाय चर्चा खालीलप्रमाणे आहे:-**

**<u>मुद्दा क्र. १ :-</u>**

**अ.** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेमार्फत औद्योगिक वसाहतीचे क्षेत्र तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या रहिवाशी क्षेत्रात पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याचा लेखाजोखा तयार करण्यास सांगितले होते, त्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी त्यांच्या ०१/१२/२०१५ च्या पत्रानुसार नवी मुंबई परिसरातील औद्योगिक क्षेत्र व नवीमुंबई महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येणारा पाण्याच्या पुरवठयाचा तपशील औद्योगिक क्षेत्र- ४५ द.लि/दिन, नवीमुंबई महानगरपालिका क्षेत्र ६५ द.लि/दिन. बैठकीच्या दरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रतिनिधींनी औद्योगिक परिसरात मोठया प्रमाणात निर्माण होणारी झोपडपट्टी व पावणे गाव परिसर इ. ठिकाणाहुन होत असलेल्या घरगुती सांडपाणी निर्माण होण्याचे प्रमाण जास्त असल्याचे नमुद केले. तसेच सदर परिसरातील घरगुती सांडपाणी संकलनाची व्यवस्था नसल्यामुळे सदरचे घरगुती सांडपाणी नाल्यात सोडले जाते ही वस्तुस्थिती आहे. यावर नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी घरगुती सांडपाणी व्यवस्थापनाबाबतचा आढावा घेऊन, माहिती सादर करण्याबाबत सांगितले. मंडळाचे सदस्य सचिव यांनी नवी महानगरपालिकेकडे म.औ.वि.परिसरातील वसाहतीतून निर्मित्त होणा-या घरगुती सांडपाणी व्यवस्थापनेबाबत अस्तित्वात असलेला

कृती आराखडा व त्याची अंमलबजावणीबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने सविस्तर अहवाल सादर करावा व घरगुती सांडपाणी व्यवस्थापनाबाबत त्रृटी निदर्शनास आल्यास नवीमुंबई महानगरपालिकेस प्रस्तावित आदेश पारित करण्याच्या सुचना दिल्या. म.औ.वि.परिसरातील वसाहतीतून निर्मित्त होणा-या घरगुती सांडपाणी व्यवस्थापनेबाबत निर्णय घेण्यासाठी मा.अध्यक्ष,म.प्र.नि.मंडळ तथा अप्पर मुख्य सचिव,पर्यावरण विभाग, आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका, मुख्य अधिकारी, म.औ.वि.महामंडळ यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी. तसेच कोणत्याही परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी जलस्त्रोतात विनाप्रक्रिया मिसळणार नाही याची पूर्णपणे काळजी घ्यावी.

**ब.** औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी वाहतूक करणाऱ्या जलवाहिन्यांमधुन होणाऱ्या गळतीस त्वरित प्रतिबंध करण्याकरीता म.औ.वि.महामंडळाने प्रस्तावित केलेला कार्यक्रम समाधानकारक व वेळेत पूर्ण करण्याकरीता SCADA सारखे उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करुन गळती थांबविण्यासाठी सुरुवातीस १०० घनमिटर/दिनपेक्षा जास्त पाण्याचा वापर करणारे उद्योग तसेच इतर आस्थापना यांना सक्तीचे करण्यात यावे. याबाबत म.औ.वि.महामंडळ यांनी त्यांचे पाण्याचे देयके व उपलब्ध माहितीच्या आधारे त्यांच्या स्तरावर कार्यवाही करावी. SCADA by 31st May 2016.

**<u>मुद्दा क्र.२ :-</u>**

सर्व वाहनांना पुरेसा सीएनजीचा पुरवठा होण्याच्या दृष्टीकोनातून मे.महानगर गॅस लि.यांनी म.औ.वि.महामंडळ परिसरात नविन स्टेशन उभारण्याकरीता लागणाऱ्या भुखंडाबाबतचा प्रस्ताव ७ दिवसांच्या आंत म.औ.वि.महामंडळाकडे सादर करावा व त्यावर म.औ.वि.महामंडळाने सत्वर निर्णय घ्यावा.

**अ.** मा.सदस्य सचिव यांनी याबाबत नवी मुंबई परिसरात वापरात असलेली वाहने अहवाल, जसे – एकूण नोंदणी झालेले ऑटो रिक्षा, कार, टेम्पो, ट्रक, बस, इ. त्यापैकी सीएनजीवर चालणारे वाहने आणि १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुनची वाहने, तसेच पीयुसीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची संख्या, इ. बाबत सांख्यिकी अहवाल १५ दिवसात सादर करण्यास सांगितले.

**<u>मुद्दा क्र.३ :-</u>**

नवी मुंबई महानगरपालिकेचे प्रतिनिधी यांनी टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले. त्यावर सदस्य सचिव यांनी रस्ते हा घटक हवा प्रदूषणाशी निगडीत असून रस्त्याची दूर्दश: ही धुलिकन वाढण्यासाठी कारणीभूत आहे. त्यामुळे रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यास सांगितले.

**<u>मुद्दा क्र.४ :-</u>**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या दिनांक ०१/१२/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेली माहिती व म.औ.वि.महामंडळ यांचे प्रतिनिधी यांनी औद्योगिक क्षेत्रातील जागेच्या नियोजनाबाबत दिलेल्या माहितीनुसार सदर औद्योगिक परिसरात जवळपास १३८ हेक्टर खुली जागा असल्याचे सांगितले. यावर मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी नवी मुंबई महानगरपालिका, म.औ.वि.महामंडळ यांनी टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे काम

पूर्ण झालेल्या ठिकाणी मोकळया जागेत त्वरित वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घ्यावा व किती वृक्षारोपण केले याबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

**<u>मुद्दा क्र.५</u> :-**

सह संचालक (हप्रनि) यांनी टीटीसी औद्योगिक वसाहतीलगत वसलेल्या १०१ स्टोन क्रशर व त्यापासुन उद्‌भवणारे वायु प्रदूषण व त्यावरील उपाय या अनुषंगाने प्रादेशिक कार्यालय नवी मुंबई यांनी ०७ स्टोन क्रशर कारखाना बंदचे आदेश दिले आहेत तसेच ४८ स्टोन क्रशरांना आपला उदयोग आपला उदयोग बंद का करु नये याबाबतची कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्याचे सांगितले. तसेच उर्वरित स्टोन क्रशरस वर कडक कारवाई करण्याचे काम चालु आहे स्पष्टीकरण केले. दगड खाणी व खडी क्रशर मशिन असोसिएशन यांचे प्रतिनिधी यांनी केलेल्या कार्यवाहीबद्दल आक्षेप नोंदविला त्यावर मा.सदस्य सचिव यांनी म.औ.वि.वसाहत व त्या परिसरातील सर्व उद्योगांनी योग्य ती हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविणे व ती नियमित चालविणे ही अत्यावश्यक बाब आहे. वातावरणातील उत्सिर्जत होणारे धुलिकण हा CEPI चे गुणांकन वाढविण्यास कारणीभूत प्रमुख घटक आहे. त्यामुळे सर्व खडी क्रशर उद्योगांनी संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच याबाबत आय.आय.टी, निरी अथवा या क्षेत्रातील तज्ज्ञांची एक समिती गठीत करुन त्वरीत सर्वेक्षण करण्यात यावे व खडी क्रशर मशिनच्या पाहणी अहवालाचे वर्गीकरण करुन खडी क्रशर मशिनवर कडक कारवाई करण्यात यावी.

**<u>मुद्दा क्र.६</u> :-**

सह संचालक (ह.प्र.नि.) यांनी सेपीचा गुणांक हा मानवाच्या आरोग्याचा घटक ग्राहय धरुन करण्यात आल्याचे सांगितले. त्यावर उद्योगांमध्ये कार्यरत कामगारांचे आरोग्याबाबतचा अहवाल औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय यांनी देणे क्रमप्राप्त आहे. सदस्य सचिव यांनी उद्योगनिहाय कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय यांना १५ दिवसांत सादर करण्यास सांगितले.

**<u>मुद्दा क्र.७</u> :-**

टीटीसी औद्योगिक परिसरात मुख्यत्वे हवा प्रदूषण सयंत्रणा सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच या परिसरात गॅसची उपलब्धता आहे. त्यामुळे उद्योगांनी गॅस या पर्यावरण पुरक इंधनाचा जास्तीत-जास्त वापर करावा. महानगर गॅस यांच्या प्रतिनिधींनी गॅस जोडणीसाठी अग्नी प्रतिबंधक ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत अडचणी येत असल्याचे सांगितले. त्यावर म.औ.वि.महामंडळ यांचे प्रतिनिधी यांनी सदर बाब लवकरात-लवकर निकाली काढण्यात येईल असे सांगितले. प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी म.औ.वि.वसाहत परिसरातील कोळशावर आधारित १६ (वस्त्र उद्योग) उद्योगांनी गॅसवर आधारित बाष्पके चालवावी असे निर्देश दिल्याचे सांगितले. त्यावर उद्योगाचे प्रतिनिधी यांनी गॅस वापरणे ही अत्यंत खर्चीक व न परवडणारी बाब असल्यामुळे त्याची पुर्तता करणे अशक्य असल्याचे सांगितले. त्यावर सदस्य सचिव यांनी मध्यम उद्योगांनी ७५ मायक्रोग्रॅम/NM3 इतकी धुलिकणाची मर्यादा पाळावी व सर्व उद्योगांचे संमतीपत्र त्याप्रमाणे सुधारित करुन दयावेत आणि अद्यावत हवा प्रदूषण संनियंत्रण यंत्रणा दि.३१/०५/२०१६ पूर्वी त्याची पुर्तता करावी, असे निर्देश दिले. तसेच याबाबत प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी याबाबत आढावा घ्यावा.

**मुद्दा क्र. ८ :-**

टीटीसी परिसरातील स्थित उद्योगांनी हवा व जल प्रदूषण निवारणाकरीता उभारलेल्या सयंत्रणेबाबत, ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशन, संबंधित उद्योग व प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी संयुक्तपणे आढावा घ्यावा व आवश्यक त्या ठिकाणी अद्यावतीकरणाचे काम हाती घ्यावे.

**मुद्दा क्र.९ :-**

टीटीसी परिसरात ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टीम बसविण्यासाठी निर्देशित केलेल्या सर्व उद्योगांनी त्याची पुर्तता करावी व याबाबत प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी आढावा घेऊन १० दिवसांत यंत्रणा न बसविणाऱ्या उद्योगांवर कारवाई करावी.

नवी मुंबई पर्यावरणीय कृती आराखडा संदर्भात झालेल्या सादरी करणाच्या अनुषंगाने, अल्प व दीर्घ कालीन उपाययोजना याची काटेकोर अंमलबजावणी करुन नवी मुंबई, टीटीसी एमआयडीसी परिसराचा सेपी स्कोर (गुणांकन) कमीत कमी ठेवण्यासाठी खालील अल्प व दीर्घ कालीन कार्यक्रमाव्दारे प्रदूषण कमी करण्यास सहाय्य करावे. तसेच सर्व संबंधित औद्योगिक असोसिएशन, एमआयडीसी, महानगर गॅस, दगड खाण, नवी मुंबई महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी, औद्योगिक आरोग्य व सुरक्षा विभाग यांची प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा दुसऱ्या गुरुवारी सेपी ॲक्शन प्लान बाबत बैठक घेण्याचे निश्चित केले. तसेच तक्त्यामध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागाने करावी, असे आदेश दिले. (कार्यवाहीचा तक्ता सोबत जोडला आहे.)

**सर्वांकष पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक (CEPI) ची गुणवत्ता कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे**

| अ. क्र. | बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे | विभागाने करावयाची कारवाई | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | म.औ.वि.परिसरातील वसाहतीतून निर्मित्त होणा-या घरगुती सांडपाणी व्यवस्थापनेबाबत अस्तित्वात असलेला कृती आराखडा व त्याची अंमलबजावणीबाबत नवी महानगरपालिकेने सविस्तर अहवाल सादर करावा व घरगुती सांडपाणी व्यवस्थापनाबाबत त्रूटी निदर्शनास आल्यास नवीमुंबई महानगरपालिकेस प्रस्तावित आदेश पारित करण्याच्या सुचना दिल्या. म.औ.वि.परिसरातील वसाहतीतून निर्मित्त होणा-या घरगुती सांडपाणी व्यवस्थापनेबाबत निर्णय | नवी मुंबई/महानगरपालिका महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/ प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई | ३० दिवस | नवी मुंबई महानगरपालिकेने घरगुती सांडपाणी व्यवस्थापनेबाबत कृती आराखडा व त्याच्या अंमलबजावणीबाबत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | घेण्यासाठी मा.अध्यक्ष,म.प्र.नि.मंडळ तथा अप्पर मुख्य सचिव,पर्यावरण विभाग, आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका, मुख्य अधिकारी, म.औ.वि.महामंडळ यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी. | | | |
| २ | औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी वाहतूककरणाऱ्या जलवाहिन्यांमधुन होणाऱ्या गळतीस त्वरित प्रतिबंध करण्याकरीता म.औ.वि.महामंडळाने प्रस्तावित केलेला कार्यक्रम समाधानकारक व वेळेत पूर्ण करण्याकरीता SCADA सारखे उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करुन गळती थांबविण्यासाठी सुरुवातीस १०० घनमिटर/दिनपेक्षा जास्त पाण्याचा वापर करणारे उद्योग तसेच इतर आस्थापना यांना सक्तीचे करण्यात यावे. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | ३महिने | म.औ.वि.महामंडळाने SCADA सारखे उपलब्ध तंत्रज्ञान वापरण्याकरिता उद्योगाच्या पाण्याचे देयके व उपलब्ध माहितीच्या आधारे त्यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यासाठी मुदत वाढवून देण्यात आली. |
| ३ | औद्योगिक परिसरात जवळपास १३८ हेक्टर खुली जागा उपलब्ध आहे. नवी मुंबई महानगरपालिका, म.औ.वि.महामंडळ यांनी टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे काम पूर्ण झालेल्या ठिकाणी मोकळया जागेत त्वरित वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घ्यावा व याबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/संबंधीत उद्योग/ नवी मुंबई महानगरपालिका, | ३ महिने | नवी महानगरपालिका आणि म.औ.वि.महामंडळ यांनी टी.टी.सी. औद्योगिक परिसरातील रस्त्याचे काम पूर्ण झालेल्या ठिकाणी मोकळया जागेत वृक्षारोपण करण्यासाठी मुदत वाढवून देण्याता आली. |
| ४ | नवी मुंबई परिसरात वापरात असलेली वाहने अहवाल, जसे – एकूण नोंदणी झालेले ऑटो रिक्षा, कार, टेम्पो, ट्रक, बस, इ. त्यापैकी सीएनजीवर चालणारे वाहने आणि १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुनची वाहने, तसेच पीयुसीचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची संख्या, इ. बाबत सांख्यिकी अहवाल सादर करणे. | प्रादेशिक परिवहन विभाग | १५ दिवस | प्रादेशिक परिवहन विभागाने अद्यापही वाहने अहवाल सादर न केल्याने त्यांना पुनश्च वाहने अहवाल सादर करण्यास मुदत वाढवून देण्यात आली. |
| ५ | वातावरणातील उत्सिर्जत होणारे धुलिकण हा CEPI चे गुणांकन वाढविण्यास कारणीभूत प्रमुख घटक आहे. त्यामुळे सर्व खडी क्रशर | दगडखाण असोसिएशन, नवी मुंबई/जिल्हाधिकारी मायनिंग विभाग / प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई | ३० दिवस | खडी क्रशर उद्योगांनी संमतीपत्रातील अटी/शर्तीचे पालन करणे आणि आय.आय.टी, निरी अथवा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उद्योगांनी संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच याबाबत आय.आय.टी, निरी अथवा या क्षेत्रातील तज्ज्ञांची एक समिती गठीत करुन सर्वेक्षण करण्यात यावे व खडी क्रशर मशिनच्या पाहणी अहवालाचे वर्गीकरण करुन खडी क्रशर मशिनवर कडक कारवाई करणे. | | | या क्षेत्रातील तज्ज्ञांची एक समिती गठीत करुन सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्यासाठी मुदत वाढवून देण्यात आली. |
| ६ | टीटीसी औद्योगिक परिसरातील उर्वरित रस्त्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे. | नवी मुंबई महानगरपालिका | ६० दिवस | नवी मुंबई महानगरपालिकेने टी.टी.सी. औद्योगिक परिसरातील उर्वरित काम पूर्ण करण्याकरिता मुदत वाढविण्यात आली. |
| ७ | उद्योगनिहाय कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल सादर करणे | औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय (DISH) | १५ दिवस | उद्योगनिहाय कामगारांच्या वैद्यकीय तपासणीचा अहवाल अद्यापही औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय (Dish) यांनी अहवाल सादर न केल्याने त्यांना पुनश्च मुदतवाढ देण्यात आली. |
| ८ | टीटीसी औद्योगिक परिसरात मुख्यत्वे हवा प्रदूषण सयंत्रणा सुस्थितीत असणे आवश्यक आहे. मोठे व मध्यम उद्योगांनी ७५ mg/NM3 इतकी धुलिकणाची मर्यादा पाळावी व सर्व उद्योगांचे संमतीपत्र त्याप्रमाणे सुधारित करणे तसेच याबाबतचा आढावा घेणे. | महानगर गॅस लि., टीबीआयए-नवी मुंबई, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ नवी मुंबई/संबंधीत उद्योग | ३ महिने | मोठे व मध्यम उद्योगांनी ७५ mg/NM3 इतकी धुलिकणाची मर्यादा पाळण्यासाठी व सर्व उद्योगांचे संमतीपत्र त्याप्रमाणे सुधारित करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली. |
| ९ | टीटीसी परिसरातील स्थित उद्योगांनी हवा व जल प्रदूषण निवारणाकरीता उभारलेल्या सयंत्रणेबाबत, ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशन, संबंधित उद्योग व प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी संयुक्तपणे आढावा घ्यावा व आवश्यक त्या ठिकाणी अद्यावतीकरणाचे काम हाती घेणे. | १.नवी मुंबई टीटीसी परिसरातील संबंधीत उद्योग<br>२.ठाणे बेलापूर इंडस्ट्रिअल असोसिएशन,नवी मुंबई, | १५ दिवस | - |
| १० | टीटीसी परिसरात ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टीम बसविण्यासाठी निर्देशित केलेल्या सर्व उद्योगांनी त्याची पुर्तता करावी व याबाबत | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ नवी मुंबई व संबंधित उद्योग | १० दिवस | प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांना आढावा घेण्यासाठी मुदत वाढविण्यात आली. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी आढावा घेऊन यंत्रणा न बसविणा-या उद्योगांवर कारवाई करणे. | | | |
| ११ | सामुहिक सांडपाणी संयंत्रणेमार्फत् प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे पुनर्वापर करणे. | ठाणे बेलापूर इंडस्ट्रिअल असोसिएशन,नवी मुंबई | ३ महिने | दिनांक ०९/०२/२०१६ रोजी मा.सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये नवीन मुद्दा मांडण्यात आला. |
| १२ | बँकहमी- ज्या उद्योगांनी प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविलेली आहे, अशा उद्योगांचा आढावा घेऊन त्या उद्योगांची बँकहमी परत करणे. ज्या उद्योगांचे प्रदूषण नियंत्रण यंत्रणा चालविण्याबाबत बँकहमी दिलेली आहे अशा उद्योगांची बँकहमीची मुदत वाढविणे. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ नवी मुंबई व संबंधित उद्योग | ३० दिवस | दिनांक ०९/०२/२०१६ रोजी मा.सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये नवीन मुद्दा मांडण्यात आला. |

बैठकीच्या समारोपा दरम्यान सह-संचालक(हप्रनि) यांनी सर्व उपस्थितांचे आभार प्रकट करुन पुढील बैठक मे २०१६ च्या मध्यावर घेण्यात येईल असे नमूद करुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

**सह संचालक (हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

-----------

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Navi Mumbai on 09/02/2016 at 02.30 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 1) | Dr. P. Anbalagan, M.S, MPCB. | | | |
| 2) | V. M. Motghare, JD(Air) | | | |
| 3) | N. S. Lohalkar, JD RO NM. | | | |
| 4) | R. R. Vasave, SRO NM-I. | | | |
| 5) | A. R. Yeole, NMMC | abhijiteye@gmail.com | 9561111212 | |
| 6) | S. K. Shirtode | shamraoshirtode@Gmail.com | 98921001 53 | |
| 7. | Akhilesh Singh. Asst. manger - EHS | akhilesh.singh@hp.co.in | 9769047722 | |
| 8. | RUTVI JAIN MGL. (Asst Mgr - CNG Mktg) | rjain@mahanagargas.com | 9167910543 | |
| 9. | Anupam Chakraborty (Sr. Mgr) - CNG | achakraborty@rediffmail / mahanagargas.com | 9321381580 | |
| 10. | Amarnath Bhim Patel Commercial - MGL | apatel@mahanagargas.com | 8425828806 | |
| 11. | Swapnil Kulkarni Projects - MGL | sgkulkarni@mahanagargas.com | 7498256733 | Kulkarni |
| 12. | S. K. Pahuja (Dir) Shiv Shankar Tex. | Shatru_Pahuja@yahoo.co.in | 9619862766 | |
| 13. | Kushal Mehra (DIR) Aarcee Innovations Pvt LTD | kushalm@mehraabacham.com | 9820301500 | |
| 14 | SALMAN MALKANI | malkanisalman@Gmail.COM | 9821352259 | Smalkani |
| 15 | Upendra Marchekhar | upendra.marchekhar@gmail.com | 9821029689 | |
| 16 | S.C. Mulay Lubrizol | srml@lubrizol.com | 9920086907 | |

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Navi Mumbai on 09/02/2016 at 02.30 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | MPCB | | | |
| 2 | MPCB | | | |
| 3 | MPCB | | | |
| 4 | MPCB | | | |
| 5. | MPCB | | | |
| 6. | R.M. Kedia V.P TBIA | | 9323007125 | [signature] |
| 7. | S. R. Iyer | | 9821731582 | [signature] |
| 8 | R N. Foledar | | 9821420739 | [signature] |
| 9. | R. Chiraj | | 9829447725 | [signature] |
| 10 | Suresh Chavan | | 9867798313 | [signature] |
| 11 | Rahul Sumbre | | 9820112855 | [signature] |
| 12 | S. B. Sawant | | 9969407340 | [signature] |
| 13 | H. C. Ahuja | | 8451900318 | [signature] |
| 14. | S. R. Hule (NOCIL) | | 9324609927 | [signature] |
| 15 | N S Katkar (Croda) | | 8879661165 | [signature] |
| 16. | S. S. Paithankar (Apar Ind. Ltd) | hse@apar.com | 9833811132 | [signature] |
| 17. | P. B. Surve (Sandoz, Kalwe) | | 9029351389 | [signature] |
| 18 | Rupesh Ingle (SI Group) | | 9773902245 | [signature] |
| 19 | Ulhas Thakur (SI Group) | | 9821260145 | [signature] |

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## Attendance Sheet

**Review meeting on implementation of progress of critically polluted areas action plan (CEPI) of Navi Mumbai on 09/02/2016 at 02.30 PM**

| Sr. No. | Name and Designation | E-mail | Mobile No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | Uday Ingade Asst. Manager-EHS | Uday.Ingade@glenmarkpharm.com | 9619797952 | [signature] |
| | Prakash Patil Officer - EHS | Patil.firesafety@alstomind.com | 9222311373 | [signature] |
| | P.R. Sansare GM-HSE | ~~Arke~~ Prashant.sansare@arkema.com | 9930499822 | [signature] |
| | Rajesh J. Jogal Asst. Manager | production@mazdecolours.com | 9702562222 | Rajesh. |
| | Ashok Mohile Dy. Manager EHS | ashok.mohile@zydustakeda.com | 9594915991 | [signature] |
| | Vinod Mankhede | vinod.mankhede@rpgls.com | 9820649773 | [signature] |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |